महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु),
अधिष्ठातायांचेकार्यालय, डॉ.ॲनीबेझंटरोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
दुरध्वनी क्रमांक ०२२ - २४९३४२१४
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

जा.क्र. राआपोम/भांडार/सोलार यंत्रणा/दरपत्रके/ २०२५/ दिनांक :- 24/11/2025

प्रति,

आहिरात

---------------------------

---------------------------

---------------------------

---------------------------

विषय:- रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई - १८.
महाविद्यालय इमारतीमध्ये विद्युत पारेषण संलग्न पध्दतीने १३ किलो वॅट क्षमतेची सोलर यंत्रणा (Solar Power) बसविण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालय इमारतीमध्ये विद्युत पारेषण संलग्न पध्दतीने १३ किलो वॅट क्षमतेची सोलर यंत्रणा (Solar Power) बसविण्यासाठी खरेदी करण्याची बाब महाविद्यालयाच्या विचाराधीन आहे. याकरिता स्थानिक बाजारातून कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तदनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, विद्युत पारेषण संलग्न पध्दतीने १३ किलो वॅट क्षमतेची सोलर यंत्रणा (Solar Power)पुरवठा करुन कार्यान्वित करणेसाठी कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके दिनांक ०८.१२.२०२५ रोजी सांय ५.०० वाजेपर्यंत रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय कार्यालयात पोहचतील अशा बेताने खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

## तपशिल

| अ..क्र. | तपशिल | ठिकाण | आवश्यक नग |
|---|---|---|---|
| १ | विद्युत पारेषण संलग्न पध्दतीने १३ किलो वॅट क्षमतेची सोलर यंत्रणा (Solar Power) | महाविद्यालयाची मुख्य इमारत | ०१ |

## अटी व शर्ती

१) दिनांक ०८.१२.२०२५ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२) दरपत्रक सादर करतांना अशा प्रकारच्या खरेदीवर शासनाकडून आकारले जाणारे विविध कर स्वतंत्रपणे नमूद करावेत.

Solar Power

३) दरपत्रक सादर करतेवेळी विद्युत पारेषण संलग्न पध्दतीने १३ किलो वॅट क्षमतेची सोलर यंत्रणा (Solar Power) पुरवठा करणेसाठी आपले काही शुल्क/दर असल्यास ते देखिल स्वतंत्रपणे नमूद करावेत.

४) दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमूद असलेल्या लेटरहेडवर सादर करावे.

५) दरपत्रके सादर करतेवेळी मोहोरबंद पाकिटावर " विद्युत पारेषण संलग्न पध्दतीने १३ किलो वॅट क्षमतेची सोलर यंत्रणा (Solar Power) दरपत्रक" असे स्पष्टपणे नमूद करावे.

६) दरपत्रकधारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकांचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध व सहभाग नसावा. आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येईल.

७) दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्थ असून नये. तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरिता सोबत जोडण्यात आलेले हमीपत्र दरपत्रक धारकास सादर करणे बंधनकारक राहील.

८) खरेदी करण्यात येणा-या प्रणालीच्या संख्येत वाढ करणे किंवा घट करणे इ. चे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

९) विहीत मुदतीत प्राप्त दरपत्रके दिनांक ०९.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. अधिष्ठाता यांचे दालनात खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील त्यावेळी कंपनीच्या एका प्रतिनीधीस स्वखर्चाने हजर राहण्याची अनुमती राहील.

( वैद्या संपदा सं.संत)
अधिष्ठाता,
रा.आ.पोदारवैद्यकमहाविद्यालय(आयु),
वरळी, मुंबई १८.

प्रत, महाविद्यालयीन सुचनाफलक

## हमीपत्र -१ ( Undertaking )

मी M/s. ..........................................................................................................

पत्ता :- ..........................................................................................................

लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ..............................................................

सेवा पुरवठासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

दिनांक :-

..........................................................................................................

## हमीपत्र-२ ( Undertaking )

मी M/s. ..........................................................................................................

पत्ता :- ..........................................................................................................

लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ..............................................................

सेवा पुरवठासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

दिनांक :-